नि.फौ.ख.क्र.३७५/२०२२
महाराष्ट्र सरकार वि. वैभव जाधव
निशाणी क्र.२८

<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ यांचा पुरावा</u>

मी शपथेवर सांगते की,

माझे नांव - मोनाली वैभव जाधव,
वय - ३४ वर्षे,
व्यवसाय - गृहिणी,
राहणार - शाहूनगर, केडगाव, अहिल्यानगर.

<u>शपथेवर सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. आर. जासुद यांच्यामार्फतः-</u>

०१. माझ विवाह आरोपी क्र.१ याच्यासोबत दिनांक १७/०५/२०१९ रोजी भाग्योदय मंगल कार्यालय, केडगाव येथे झाला होता. लग्न झाल्यानंतर मी तुकाराम नगर, धोलवड, ता. जुन्नर, जि. पुणे येथे सासरी नांदण्यासाठी गेले. त्याठिकाणी मी, माझे पती व सासू सासरे असे आम्ही एकत्र राहत होतो. मी सासरी नांदत असताना माझे पती कोणताही कामधंदा करत नव्हते. सुरुवातीचे काही महिने त्यांनी मला व्यवस्थित नांदवले. त्यानंतर आरोपी क्र. ३ या माझ्याशी किरकोळ कारणावरुन वाद घालत असत. सदर बाबी मी माझ्या पतीला सांगितल्यावर ते देखील माझ्याशी वाद घालत असत. मला माझ्या सासरी नांदायचे असल्यामुळे मी सर्व त्रास सहन करत होते. मला आरोपी क्र. १ व ३ हे किरकोळ कारणावरुन शिवीगाळ व मारहाण करत असत. तरीही मी सर्व सहन करत होते. त्यानंतर आरोपींनी मला माझ्या माहेरुन वाघोली येथे प्लॉट घेण्यासाठी रक्कम रुपये दोन लाख घेवून ये अशी मागणी करत. त्यावेळेस मी त्यांना माझ्या वडिलांची परिस्थीती नसल्यामुळे मी एवढी रक्कम देवू शकत नाही असे सांगितले. तरी देखील त्यावरुन आरोपी क्र. १ हे मला मारहाण व शिवीगाळ करत असत. तरीही मी सर्व गोष्टी संसारासाठी दूर्लक्ष केल्या.

०२. त्यानंतर दि. २८/०९/२०२० रोजी मला एक मुलगी झाली. मी सासरी असताना माझी डिलीव्हरी झाली होती. त्यानंतर मी सासरहून माहेरी गेले. माहेरी गेल्यानंतर मी माझ्या वडिलांना सर्व घडलेल्या गोष्टी सांगितल्या. त्यानंतर माझ्या

वडिलांनी आरोपी क्र. २ यांना फोन केला व त्यांना परत असे वागू नका असे समजावून सांगितले. परंतु त्यांनी काही ऐकले नाही. त्यानंतर मी स्वतःहून आरोपी क्र. १ व २ यांना मला घेवून जाण्यासाठी फोन केले परंतु ते मला पैसे घेवून ये व मगच घरात ये असे म्हणाले. मार्च २०२१ मध्ये आरोपी क्र. १ व २ हे माझ्या घराबाहेर आले व त्यांनी माझ्या वडिलांना अरेरावी केली व तेथून निघून गेले व मला तेथून घेवून गेले नाहीत. कोरोना कालावधीमध्ये माझ्या माहेरचे सर्व कोविड पॉझीटिव्ह होते त्यामुळे मी माझ्या बाळाला घेवून सासरी गेले. परत छोट्या छोट्या गोष्टींवरुन आरोपी माझ्याशी वाद घालत होते. दि. १४/०५/२०२१ रोजी आरोपींनी माझ्याशी भांडण केले व मला व माझ्या मुलीला राहत्या घरातून अंगावरील कपडयानिशी घराबाहेर काढले. तसेच त्यांनी मला माझ्या काही चिज वस्तू, दागदागिने व एटीएम कार्ड इत्यादी घेवू दिले नाही. त्यानंतर मी माझ्या माहेरी आले. मी भरोसा सेल येथे आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली. त्याची तारीख आता मला आठवत नाही. त्याठिकाणी माझ्यात व आरोपींमध्ये तीनवेळा समुपदेशनाच्या बैठका झाल्या परंतु आमच्यात काही समुपदेशन झाले नाही. त्यामुळे मी आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. आता मला सदरची फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर व खरा आहे. त्यास **नि-क्र. पी-१/पी.डब्ल्यु-१** देण्यात येते. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकते. आजरोजी आरोपी क्र.१ न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री.टी.झेड. सोनवणे यांच्यामार्फत उलटतपास सुरुः-

०३. माझे शिक्षण बीसीए व एमबीए मध्ये झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही लग्नानंतर चार ते पाच महिन्यांनी पुणे येथे भाडयाने घर घेवून राहण्यास गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी दिलेल्या फिर्यादनुसार आरोपींनी मला लग्नानंतर एक वर्ष चांगले नांदवले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ३ यांनी मला ज्या कारणावरुन शिवीगाळ केली ती कारणे मी फिर्याद देताना पोलिसांना सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीच्या जन्मापूर्वी माझ्या सासरी आरोपींनी मला कोणत्या दिवशी व वेळी शिवीगाळ केली याची तारीख फिर्यादमध्ये नमूद नाही. हे म्हणणे

खरे आहे की, मी माझ्या फिर्यादमध्ये आरोपीपैंकी कोणी मला काय शिवीगाळ केली हे मी पोलिसांना सविस्तर/विस्तृत सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद देताना पोलिसांना आरोपींनी मला माझ्या माहेरुन पुणे येथे प्लॉट घेण्यासाठी रक्कम रुपये दोन लाख घेवून ये अशी मागणी केली याची दिनांक व वेळ सांगितली नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी मला ज्यावेळेस पैशांची मागणी केली त्यावेळेस मी पोलीस स्टेशनमध्ये त्याबाबत आरोपींविरुद्ध तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी मला मारहाण केल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र मी पोलिसांना दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडलेली नसल्यामुळे मी वैद्यकीय प्रमाणपत्र पोलिसांना दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींना मला थेट पैसे मागितल्याबाबत मी कोणताही पुरावा जसे की, हॉट्स अॅप मेसेज, एसेमेस पोलिसांना दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जुलै २०२० मध्ये माझ्या सासरी आरोपींनी डोहाळे जेवणाचा कार्यक्रम केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस सर्व कार्यक्रमाचा व जेवणाचा खर्च आरोपी क्र. २ ने केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मुलीच्या डिलीव्हरीच्या वेळी आरोपी क्र. १ ने मला दवाखान्यात दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी डिलीव्हरीच्या वेळी दवाखान्यात अॅडमीट असताना आरोपी क्र. १ हे माझ्यासोबत सतत राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या डिलीव्हरीचा सर्व खर्च आरोपी क्र. २ ने केला होता.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी डिलीव्हरी झाल्यानंतर माझ्या माहेरी गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादमध्ये माहेरी गेल्यानंतर आरोपी क्र.१ व २ यांना मला घेवून जाण्याबाबत कोणत्या तारखेस फोन केले होते हे पोलिसांना जबाब देताना सांगितले नव्हते. साक्षीदार स्वतः हून सांगते की, मी आरोपी क्र. १ व २ यांना रोज फोन करत होते. हे म्हणणे खरे नाही की, १६/०२/२०२१ मध्ये आरोपी हे मला सासरी घेवून जाण्यासाठी माझ्या माहेरी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या माहेरच्यांनी आरोपींना माझ्या भावाला व्यवसायासाठी आरोपींनी पैसे दिले तर नांदायला जाईल असे बोलून त्यांना शिवीगाळ करुन हाकलून दिले होते. सन २०२१ मध्ये मला कोरोना झाला

होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस माझ्या माहेरच्यांनी मला आरोपींच्या घरी जाण्यास सांगितले होते. साक्षीदार स्वतः हून सांगते की, मी स्वतःहून आरोपींच्या घरी गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ यांनी मला कोविड झाल्यामुळे आळेफाटा येथे आणले होते व त्यांनी स्वतः उपचार केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर उपचाराचा खर्च आरोपी क्र. १ याने केला होता.

०६. दि. १४/०५/२०२१ रोजी आरोपींनी मला व माझ्या मुलीला किती वाजता घरातून हाकलून दिले हे मला सांगता येणार नाही. त्यावेळेस मी माझे, पती, सासू सासरे व माझी मुलगी असे हजर होतो. दिनांक १४/०५/२०२१ रोजी मी माझ्या माहेरच्यांना अनोळखी व्यक्तीच्या फोन वरुन फोन करुन बोलावून घेतले होते व माहेरचे मला घेण्यास आले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १३/०५/२०२१ रोजी मी माझ्या माहेरच्यांना फोन करुन दि.१४/०५/२०२१ रोजी धोलवड येथे बोलावून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १४/०५/२०२१ रोजी माझ्या माहेरच्यांनी आरोपींकडे पैशांची मागणी केली परंतू ती पूर्ण न झाल्यामुळे मी माझ्या माहेरी जाण्याचा निर्णय घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे एटीएम कार्ड ब्लॉक करण्यासाठी बँकेमध्ये अर्ज केला होता. मला माझ्या एटीएम कार्डचा क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या सोन्याच्या दागिन्यांचा तपशील व पावत्या पोलिसांना दिल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी मला आरोपींनी घरातून हाकलून दिले त्यादिवशी किंवा दुस-या दिवशी मी पोलीस स्टेशनमध्ये आरोपींविरुद्ध तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, असे काही घडले नाही म्हणून मी तक्रार दिली नाही.

०७. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२१ मध्ये आरोपी क्र.१ ने राजगुरु नगर पुणे येथील न्यायालयामध्ये विवाह याचिका क्र. ३३६/२०२१ दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर याचिका दाखल होण्यापूर्वी मी एकही तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर याचिका दाखल झाल्यानंतर मी प्रस्तुत केसमध्ये एफआयआर दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना माझ्या भावाच्या व्यवसायासाठी रक्कम रुपये २,००,००० द्या नाहीतर

मी घर सोडून जाईल व खोटया केसेसमध्ये अडकवीन अशी धमकी देत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने पैसे दिले नाही म्हणून आमच्यामध्ये वाद वाढले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुद्ध सूडबुद्धीने सदरची केस दाखल केली आहे. हे मला आता आठवत नाही की, मी आरोपींना मला नांदावण्यास घेवून जा याबाबत माझ्या वकिलांमार्फत नोटीस पाठवली होती किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला दि. १४.०५.२०२१ रोजी उपाशीपोटी ठेवून शिवीगाळ करुन अंगावरील वस्त्रानिशी घराबाहेर हाकलून दिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे दागिने व एटीएम हे आरोपींकडे असून त्यांनी मला ते दिले नाही असा मी त्यांच्याविरुद्ध खोटा आरोप केला आहे.

०८. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी मला नांदवणार नाहीत असे भरोसा सेल येथे सांगितल्यामुळे मी प्रस्तुतची केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमधील व सरतपासातील सर्व आरोप खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींकडून पैसे उकळण्यासाठी सूडबुद्धीने त्यांच्याविरुद्ध सदरची केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

DEEPIKA KRISHNARAO PATIL
Digitally signed by DEEPIKA KRISHNARAO PATIL
Date: 2026.09.03 17:27:35 +0530

दिनांकः-०३/०९/२०२६
अहमदनगर

(श्रीमती डी.के.पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०१, अहमदनगर.